दिनांक २७ डिसेंबर २०१८

**कृपया प्रसिद्धीसाठी**

**19 वा पार्ले महोत्सव – सी. एम. चषक**

**कला-क्रीडा मधील सहभागातून होणा-या स्नेहबंधनामुळे खरे मित्र मिळतात : अमृता फडणवीस**

आज सोशल मिडिया नेटवर्किंगच्या माध्यमातून हजारो मित्र मिळत असले तरी कला – क्रीडा मधील सहभागातून निर्माण होणा-या स्नेहबंधामुळे खरे मित्र मिळतात, असे प्रतिपादन श्रीमती अमृता फडणवीस यांनी केले. पार्ले महोत्सव-सी.एम. चषकासारख्या उपक्रमांतून कलागुण विकसित होतातच पण मुख्य म्हणजे माणूस इतरांसोबत जोडला जातो, असे सांगत 19 वर्षे सातत्याने हा स्तुत्य उपक्रम चाललल्याबद्दल त्यांनी प्रमुख आयोजक आमदार पराग अळवणी यांचे अभिनंदनही केले. त्या 19 व्या पार्ले महोत्सव-सी.एम. चषकातील बुद्धीबळ, कॅरम, खो-खो तसेच चित्रकला, हस्ताक्षर, रांगोळी स्पर्धांच्या बक्षीस समारंभात बोलत होत्या. यावेळी सुरु असलेल्या कबड्डी, व्हॉलीबॉल व बॉक्स क्रिकेटच्या संघानांही मैदानावर जावून त्यांनी शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्रात सर्वत्र होत असलेल्या सी.एम. चषकातून 40 लाख स्पर्धक भाग घेत असून हा देशातील सर्वात मोठा उपक्रम असल्याचे कौतुकोद्गारही त्यांनी काढले. याप्रसंगी उपस्थिती पार्लेकरांसोबत तार जुळवत पार्ले हे मुंबईतीलच नव्हे तर देशात व जगातील एक सांस्कृतिक केंद्र असल्याचेही त्यांनी सांगितले. इंटरनॅशनल स्कूलच्या जमान्यातही पार्ले टिळक विद्यालयासारख्या शाळा, इंटरनेटच्या काळातही होणा-या गाण्यांच्या मैफली यासोबत पार्ल्यातील प्रसिद्ध बाबूचा वडाचाही नामोल्लेख करताच उपस्थितांनी उत्सफूर्त टाळ्या वाजवून दाद दिली.

काल चवथ्या दिवशी टेनिस, नृत्य, शॉर्ट फिल्म्स या स्पर्धांची सुरुवात होऊन एकूण चार दिवसांत 24 प्रकारच्या स्पर्धांमधून आतापर्यंत सुमारे 32 हजार स्पर्धकांनी सहभाग घेतला असल्याची माहिती 19 वा पार्ले महोत्सव – सी. एम. चषकाचे प्रमुख आयोजक व भाजपा आमदार ॲड. पराग अळवणी यांनी दिली. यापैकी पूर्ण झालेल्या 16 स्पर्धांमधून विविध गटांमधून सुमारे 200 पेक्षा अधिक प्रथम पारितोषिकांसह 3000 पेक्षा अधिक स्पर्धकांना बक्षिसे बहाल करण्यात आली आहेत. पुढील 4 दिवसांत आणखी 30 हजार स्पर्धक भाग घेण्याची अपेक्षा असून किमान 150 प्रथम पारितोषिकांसह 2500 ते 3000 स्पर्धकांना बक्षिसे मिळणार आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

पहिल्या 4 दिवसांत पार्ले महोत्सवातील स्पर्धा पाहण्यासाठी स्पर्धकांच्या पालक – मित्र परिवारांसह कला व क्रीडा रसिकांनी उपस्थिती दर्शविली असून पार्ले पूर्व येथील दुभाषी मैदानावरील खास बनविलेले स्टेडियम तसेच पार्ले पश्चिम येथील स्पोर्टिंग लायन्स मैदानावरील बनविलेले स्टॅण्ड्स तसेच साठ्ये महाविद्यालयातील मैदान व वर्ग खोल्यांमध्ये आवर्जून बसलेल्या रसिक प्रेक्षकांच्या गर्दीमुळे हौशी मंडळींच्या स्पर्धेऐवजी व्यावसायिक कलावंत-क्रीडापटूंच्या कला व खेळांचे प्रदर्शन होत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

या महोत्सवास नगरसेवक पंकज यादव, अनिष मकवाणी, अभिजीत सामंत, मुरजी पटेल, सुनीता मेहता, मुंबई भाजपा प्रवक्ता संजय ठाकूर, मुंबई भाजपाचे सचिव विमल भूता, एन. सुरेशन, हेमांग जांगला, मुंबई भाजपा महिला मोर्चाच्या सरचिटणीस रिद्धी धुरी, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष विलास करमलकर त्याचबरोबर राष्ट्रीय पातळीवरील व्हॉली बॉल खेळाडू कल्पेश पटेल, अनुराग नाईक, सिद्धार्थ फाटक, श्री. मोरे आदी मान्यवरांनी पार्ले महोत्सवास आवर्जून भेट दिली आहे. या कार्यक्रमांसाठी वरिष्ठ आयोजन समिती आणि भाजपा विधानसभा पदाधिकारी श्रीकृष्ण आंबेकर, प्रविर कपूर, गुरचरणसिंग सिद्धू, मिलिंद शिंदे आणि कौंतेय देशपांडे, सचिन कोंडे, संजय वाकोडे आदी मंडळी यावेळी व्यासपीठावर उपस्थित होती.